# सन्मती सहकारी बँक लि., इचलकरंजी

7/111, जनता चौक, लक्ष्मी मार्केट, इचलकरंजी

## ❖ Inoperative / Dormant Account

ज्या खात्यात (बचत/चालू खाती) सलग २ वर्षे कोणताही ग्राहक-प्रेरित व्यवहार होत नाही, त्या खात्याला बँकिंग नियमांनुसार Inoperative / Dormant Account म्हणून वर्गीकृत केले जाते.

➢ निष्क्रिय खाते सक्रिय करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया

१.ग्राहकाने बँकेच्या कोणत्याही शाखेत खालीलपैकी एक OVD (अधिकृत वैध कागदपत्र) व अलीकडील पासपोर्ट साईज फोटो सोबत जमा करावा. खातेदाराची सही बदलली असल्यास नवीन सही नमुना शाखेत सादर करणे आवश्यक आहे.

खालील कागदपत्रे OVD म्हणून ग्राह्य धरली जातील :

१.आधार कार्ड २.ड्रायव्हिंग लायसन्स ३.पासपोर्ट ४.भारत निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदार ओळखपत्र ५.राज्य सरकारने जारी केलेले NREGA जॉब कार्ड ६.National Population Register (NPR) मधील नाव व पत्ता असलेले पत्र

OVD सोबतच PAN कार्ड किंवा Form-60 भरून जमा करणे बंधनकारक आहे.

२) सक्रिय करण्यासाठी व्यवहाराची आवश्यकता

कागदपत्रे पडताळून झाल्यानंतर ग्राहकाला किमान एक व्यवहार करविणे आवश्यक असू शकते, ज्याद्वारे खाते पुन्हा सक्रिय (Operative) श्रेणीत वर्गीकृत केले जाईल.

३) ग्राहक अर्ज (Customer Request Letter)

निष्क्रीय खाते पुन्हा सक्रिय करण्यासाठी ग्राहकाने बँक शाखेतील खाते सक्रिय करण्यासाठीचा अर्ज देणे अनिवार्य असून, ग्राहकाच्या स्वाक्षरीसह शाखेत जमा करावा. खाते सक्रिय करण्यासाठीचा अर्ज सोबत जोडत आहे.

SANMATI SAHAKARI BANK LTD., ICHALKARANJI (Multi State Bank) H.O.